# जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय

प्रकाशगड, २रा माळा, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६४७४२११ विस्तारीत - ३६४२ दूरभाष : २६५८ १५१६
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/

## वृत्तपत्र टिप्पणी

## औष्णिक संचांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी महानिर्मितीचा एन.टी.पी.सी. शी करार

दिनांक : ०६/०८/२०११.

मुंबई : महानिर्मितीच्या औष्णिक संचांची कार्यक्षमता अधिकतम स्तरावर नेण्याच्या दृष्टीकोनातून तसेच या संचांतून कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त वीजनिर्मिती साध्य व्हावी यासाठी महानिर्मितीने आता देशाच्या वीजनिर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य एन.टी.पी.सी. (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन) या संस्थेची तज्ञ सल्लागार म्हणून नुकतीच नियुक्ती केली आहे. एन.टी.पी.सी. ची सध्याची स्थापित क्षमता २८८४० मेगावॅट इतकी प्रचंड असून ती देशातील सर्वात मोठी वीज कंपनी आहे.

या अनुषंगाने मुंबई येथे दिनांक ०६ ऑगस्ट रोजी महानिर्मिती व एन.टी.पी.सी. यांच्यादरम्यान सदर करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या. या प्रसंगी महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक सुब्रत रथो, संचालक (वित्त) गुलाबसिंग गिरासे, संचालक (संचलन) माणिक वाघमोडे, तसेच एन.टी.पी.सी. चे आय.जे. कपूर (संचालक - वाणिज्य) यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर करारावर महानिर्मितीतर्फे एन.के. तडैय्या (मुख्य अभियंता - कार्य) व एन.टी.पी.सी. तर्फे ए.एन. मिश्रा (अतिरिक्त महाव्यवस्थापक) या दोहोंनी स्वाक्षरी केल्या. या करारान्वये महानिर्मितीच्या वीजनिर्मिती संचांचे संचलन व सुव्यवस्था याबाबत महानिर्मितीच्या औष्णिक संचांच्या कामगिरीचा स्तर (उदा. संचांचा भारांक, उपलब्धता, उष्मांक इ.) अधिकतम उंचावण्यासाठी एन.टी.पी.सी. च्या तज्ञांकडून महानिर्मितीच्या प्रत्येक औष्णिक विद्युत केंद्रात प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाणार आहे. सदर तज्ञ संस्थेद्वारा यापूर्वीच महानिर्मितीच्या वीजनिर्मिती संचांचे आयुर्मान, त्यांची सद्यःस्थिती व सध्याची प्रचलित कार्यपध्दती इ. चा सविस्तर अभ्यास करुन महानिर्मितीसाठी "कामगिरी सुधारणा योजना" सादर करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत महानिर्मितीच्या प्रत्येक औष्णिक वीज केंद्रात व मुख्यालय येथे एन.टी.पी.सी. या संस्थेचे एकूण २० तज्ञ महानिर्मितीला मार्गदर्शन करणार आहेत. यासाठी महानिर्मितीद्वारे मुख्यालय व क्षेत्रीय पातळीवर संचलन - सुव्यवस्था, ऊर्जा कार्यक्षमता यांसारख्या विशेष गटांची स्थापना करण्यात आली आहे. या कराराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संचलन - सुव्यवस्था याबरोबरच परिणामकारक इंधन व्यवस्थापन, कोळसा वाहतूक व हाताळणी, पर्यावरण व्यवस्थापन, सामुग्री व्यवस्थापन, मानव संसाधन, आणि वित्त यांसारख्या क्षेत्रातही एन.टी.पी.सी. द्वारा महानिर्मितीला मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच महानिर्मितीच्या प्रकल्पातील नवीन संचांची चाचणी (सी.ओ.डी. / पी.ओ.जी.), जुन्या संचांचे नूतनीकरण व आधुनिकीकरण, तसेच औष्णिक वीज केंद्रातील तांत्रिक बिघाडांचे प्रमाण कमी करण्यासाठी देखील हे तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे.

औष्णिक संचांचा भारांक एक टक्क्याने वाढल्यास महानिर्मिती कंपनीच्या संचलन - सुव्यवस्था खर्चात प्रतिवर्षी अंदाजे सुमारे रु. ४० कोटी इतक्या प्रमाणात बचत शक्य होणार आहे.


एनटीपीसी
NTPC
A Maharatna Company
MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.
SIGNING OF AGREEMENT
A.N. MISHRA
N.K. TADAIYA
M.G. WAGHMODE